**श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय, महाल नागपूर**

**शैक्षणिक सत्र : २०२४-२५**

**मराठी विभाग**

**कार्यक्रम अहवाल**

## सृजन वॉल मॅगझिन - उद्घाटन

श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय, महाल ,नागपूर येथे दिनांक 12 ऑगस्ट 2024 रोजी मराठी विभागातर्फे सृजन वॉल मॅगझिनचे उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सुप्त व कलात्मक गुणांना वाव देण्याच्या अनुषंगाने सृजन वॉल मॅगझिन भाषा विभागातर्फे आयोजित केली जाते . 'श्रावणसरी' या शीर्षकाअंतर्गत मराठी साहित्यातील श्रावण ,पाऊस, निसर्ग घटकांवर आधारित कविता आशयात्मक रेखाटन करून अत्यंत सृजनशीलरित्या भितीचित्र विद्यार्थ्यांनी तयार केलेत. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी श्रीमती चंद्रा यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उज्वल लांजेवार, उपप्राचार्य डॉ. सुचिता मराठे ,पर्यवेक्षक प्रा. आरती बरगे तसेच मराठी विभागाच्या समन्वयक डॉ . राजश्री गजघाटे , डॉ.गायत्री ताजणे , डॉ.कविता लुटे , डॉ . विद्या महाजन व प्रा. वर्षा पाटील यांच्या समवेत प्राध्यापक वृंदाची व विद्यार्थीनींची उपस्थिती होती.







**********************

Klute
डॉ. कविता लुटे

Patil
प्रा. वर्षा पाटिल

# लेखन - वाचन कौशल्य कार्यशाळा

श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय ,महाल ,नागपूर येथे ग्रंथालय विभाग आणि मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'वाचन - संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमा अंतर्गत लेखन - वाचन कौशल्य कार्यशाळेचे आयोजन दिनांक 10 जानेवारी 2025 रोजी महाविद्यालयातील अभिव्यक्ती सभागृहात करण्यात आले . विद्यार्थ्यांमध्ये लेखन - वाचन कौशल्य विकसित व्हावे या अनुषंगाने ही कार्यशाळा घेण्यात आली . कार्यशाळेचे उद्घाटक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उज्वल लांजेवार यांनी आपल्या संबोधनातून प्रत्येकाच्या आयुष्यात वाचनसंस्कृतीचे असलेले महत्व अधोरेखित केले. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात सुप्रसिद्ध कवयित्री श्रध्दा शौर्य यांनी लेखन हे विचार अभिव्यक्त करण्याचे माध्यम आहे तर वाचन हे लेखन प्रगल्भ करण्याचे प्रभावी साधन आहे, असे विचार व्यक्त केले. दुसऱ्या सत्रात नवोदित लेखक श्री. निखील देशपांडे यांनी लेखनाच्या नवनवीन संधीची ओळख करून देत सखोल वाचनाने लिखाण प्रभावी कसे होते यासंबधी विचार व्यक्त केले.याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.सुचिता मराठे ,पर्यवेक्षक प्रा. आरती बरगे, ग्रंथपाल डॉ. अपर्णा चौधरी, मराठी विभाग समन्वयक डॉ. राजश्री गजघाटे , डॉ. गायत्री ताजने, डॉ. कविता लुटे व प्रा .वर्षा पाटील यांची उपस्थिती होती. एकूण 56 विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सहभाग नोंदवला.







देशोन्नती

श्रीमती बिंझानी महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम


बिंझाणी महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम

*********************************************************

Klute
डॉ. कविता लुटे

प्रा. वर्षा पाटील

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने दिनांक 14 जानेवारी ते 28 जानेवारी 2025 या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला. दैनंदिन जीवन व्यवहारात मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर वाढावा या उद्देशाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येतो. या अंतर्गत 23 जानेवारी 2025 रोजी इंग्रजी - मराठी पर्यायी शब्दार्थावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. 25 जानेवारी 2025 रोजी म्हणी व वाक्प्रचाराचा विद्यार्थ्यांमध्ये वापर वाढावा या हेतूने म्हणी व वाक्प्रचारांवर आधारित ओळखा पाहू स्पर्धा आयोजित केली गेली. 27 जानेवारी 2025 रोजी काव्यवाचन स्पर्धा घेण्यात आली. महाराष्ट्राची लोकसंस्कृती व लोकपरंपरा या विषयावर आधारित रांगोळी स्पर्धेचे आयोजन 28 जानेवारी 2025 रोजी करण्यात आले. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचा समारोपीय कार्यक्रम आणि मराठी भाषेच्या वैभवशाली परंपरेचा समृद्ध इतिहास अधोरेखित करणाऱ्या प्रतिकृतींची प्रदर्शनी 29 जानेवारी 2025 रोजी आयोजित करण्यात आली कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे उपस्थित होते. त्यांनी आपल्या वक्तव्यातून प्राचीन व अर्वाचीन साहित्याचा अनुबंध भाषेला अभिजातता प्रदान करीत असतो असे विचार व्यक्त केले. तसेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने आता ही ज्ञानभाषा व्हावी याचा आग्रह होणे गरजेचे आहे, यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उज्वल लांजेवार होते. कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. सुचिता मराठे, पर्यवेक्षिका प्रा. आरती बरगे, मराठी विभागाच्या समन्वयक डॉ. राजश्री गजघाटे, डॉ. गायत्री ताजने, डॉ. कविता लुटे, प्रा. वर्षा पाटील यांची उपस्थिती होती. पंधरवडाअंतर्गत आयोजित विविध स्पर्धांमधील विजेत्यांना अतिथींच्या हस्ते पारितोषिक व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.







लोकमत

मराठी भाषा संवर्धन पंशरवडा



देशोन्नती

मराठी भाषा ही ज्ञानभाषा व्हावी : डॉ. शैलेंद्र लेंडे

Nagpur Edition
Feb 2, 2025 Page No. 2
Powered by: erelego.com



तरुण भारत

मराठी ही ज्ञानभाषा व्हावी

********************************


डॉ. कविता लुटे

प्रा. वर्षा पाटील

# मराठी भाषा गौरव दिन

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कविवर्य कुसुमाग्रजांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून मराठी विभागाच्या वतीने दिनांक 4 मार्च 2025 रोजी मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध लेखिका प्रा. मीनल येवले उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या वक्तव्यातून मराठी भाषेला लाभलेली थोर व वैभव संपन्न परंपरा विशद करून कुसुमाग्रजांच्या साहित्यकृतीचे मराठी साहित्य विषयातील अढळस्थान अधोरेखित केले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उज्वल लांजेवार यांनी भूषवले. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त कुसुमाग्रजांच्या कवितांवर आधारित अभिनव अशा चित्रकविता स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. एकूण 39 विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. स्पर्धेचे परीक्षण महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. सुचिता मराठे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. वासंती निचकवडे यांनी केले कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. सुचिता मराठे , पर्यवेक्षिका प्रा. आरती बरगे,मराठी विभागाच्या समन्वयक डॉ. राजश्री गजघाटे, डॉ. गायत्री ताजने, डॉ. कविता लुटे, प्रा.वर्षा पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले. अतिथींच्या हस्ते चित्रकविता स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक प्रदान करण्यात आले तसेच प्रत्येक स्पर्धकाला सहभागाबद्दल बक्षीस देण्यात आले.कार्यक्रमाला प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.








Klute
डॉ. कविता लुटे

Patil
प्रा. वर्षा पाटील

# देशोन्नती

## श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन



नागपूर : श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय, महाल येथे मराठी विभागाच्या वतीने ज्ञानपीठपुरस्कार विजेते कविवर्य कुसुमाग्रजांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. उज्वल लांजेवार होते. प्रमुख अतिथी सुप्रसिद्ध लेखिका मीनल येवले यांनी मराठी भाषेला लाभलेली थोर व वैभवसंपन्न परंपरा विषद करून कुसुमाग्रजांच्या साहित्यकृतींचे मराठी साहित्य विश्वातील अढळस्थान अधोरेखित केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उज्वल लांजेवार यांनी मराठी भाषेचे संवर्धन करण्याची जबाबदारी प्रत्येकच मराठी भाषिकाची असून त्यासाठी आपण निरंतर प्रयत्नरत राहावे, असे विचार व्यक्त केले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. सुचिता मराठे, पर्यवेक्षिका प्रा. आरती बरगे, डॉ. गायत्री ताजने, डॉ. कविता लुटे उपस्थित होत्या. प्रास्ताविक प्रा. वर्षा पाटील यांनी केले. संचालन ईशिका बुरडे यांनी तर, भाविका खरवडे यांनी आभारप्रदर्शन केले. भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित चित्रकविता स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी कुसुमाग्रजांच्या कवितांना चित्ररूपाने रेखाटले. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

Nagpur Edition
Mar 8, 2025 Page No. 2
Powered by: erelego.com

# लोकमत

## बिंझाणी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन

नागपूर : श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय महाल येथे मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. लेखिका मीनल येवले प्रमुख अतिथी होत्या. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. उज्वल लांजेवार, उपप्राचार्य डॉ. सुचिता मराठे, प्रा. आरती बरगे, डॉ. गायत्री ताजने, डॉ. कविता लुटे, ईशिका बुरडे आदींचे सहकार्य लाभले.

Hello Nagpur
Page No. 6 Mar 08, 2025
Powered by: erelego.com

Klute
डॉ. कविता लुटे

Vpati
प्रा. वर्षा पाटील